**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 20-07-2021**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये नागपूर ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2021-07-20 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2021-07-21 | 2021-07-22 | 2021-07-23 | 2021-07-24 | 2021-07-25 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 16.8 | 44.6 | 27.9 | 19.6 | 2.4 |
| कमाल तापमान (अं.से) | 31.4 | 28.6 | 26.6 | 27.4 | 31.9 |
| किमान तापमान (अं.से) | 24.6 | 22.5 | 22.6 | 21.8 | 22.9 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 90 | 91 | 92 | 88 | 85 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 85 | 84 | 86 | 78 | 75 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 6.0 | 9.0 | 10.0 | 10.0 | 6.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 293 | 288 | 293 | 252 | 283 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 8 | 8 | 8 | 8 | 7 |

## हवामान सारांश / चेतावणी:

नागपुर तालुक्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकानिहाय मूल्य वर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक २१ जुलै २०२१ ते २५ जुलै २०२१ दरम्यान आकाश आंशिक ते पूर्णतः ढगाळ राहण्याची आणि हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

कृषी रसायनांची फवारणीआणि उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची कामे पावसाचा अंदाज लक्षात घेता पुढे ढकलावी. शेतकरी बांधवांनी भाजीपाला, फळबागा आणि इतर पिकामध्ये पाणी साचून राहणार नाही यासाठी याची दक्षता घ्यावी. शेतकरी बांधवांनी कीड आणि रोगाचा प्रादुर्भाव जाणण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण करावे तसेच शिफारशीनुसार पिक वाढीच्या सुरुवातीच्या अवस्थेमध्ये नियंत्रणाच्या उपाययोजनाचा अवलंब करावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

शेतकरी बांधवांनी भाजीपाला, फळबागा आणि इतर पिकामध्ये पाणी साचून राहणार नाही यासाठी याची दक्षता घ्यावी.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सोयाबीन | पावसाचा अंदाज लक्षात घेता सोयाबीन पिकामध्ये पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी.शेतकरी बांधवांनी अळ्या खाणाऱ्या शिकारी पक्ष्यांना थांबण्यासाठी सोयाबीन शेतात विविध ठिकाणी ‘ T ’ आकाराचे पक्षीथांबे उभारावेत.वेळेवर पेरणी केलेल्या सोयाबीन पिकामध्ये पावसाचीउघडीपपाहूनआंतरमशागतीचीकामे (डवरणी, खुरपणी) वाफसा आल्यानंतर करावी. खोड माशी किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यानंतर |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | थायमेथोक्झाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ % झेडसी २.५ मिली किंवा इथिऑन ५० टक्के ईसी १५ मिली किंवा क्लोरअँट्रानिलीप्रोल १८.५% एससी २ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाच्या उघाडीचा दिवस बघून वाफसा आल्यानंतर फवारणी करावी. पांढऱ्या माशीच्या प्रौढ पतंग अवस्थेतील किडीच्या निरीक |
| कपाशी | पावसाचा अंदाज लक्षात घेता कापूस पिकामध्ये पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी.फवारणी ची कामे पाऊसाची उघडीप नंतर जमिनीमध्ये वाफसा आल्यानंतर कोरडा दिवस पाहून करावीत. कपाशीमध्ये शंखी/गोगलगाय च्या व्यवस्थापनासाठी शेतातील धुरे/बंधारे तन आणि इतर कुजलेल्या अवशेषापासून मुक्त ठेवावे. प्रादुर्भाव जास्त असल्यास ज्या ठिकाणी प्रादुर्भाव असेल त्या ठिकाणी (स्पॉट एप्लिकेशन) क्लोरपायरीफॉस २० ईसी २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून द्यावे. पांढऱ्या माशीच्या निरीक्षणासाठी पिवळे चिकट सापळे लावावेत. |
| मुग | पावसाचा अंदाज लक्षात घेता मुग पिकामध्ये पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी.वेळेवर पेरणी केलेल्या मुग पिकामध्ये पावसाचीउघडीपपाहूनआंतरमशागतीचीकामे (डवरणी, खुरपणी) वाफसा आल्यानंतर करावी. |
| उडीद | पावसाचा अंदाज लक्षात घेता उडीद पिकामध्ये पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी.वेळेवर पेरणी केलेल्या उडीद पिकामध्ये पावसाचीउघडीपपाहूनआंतरमशागतीचीकामे (डवरणी, खुरपणी) वाफसा आल्यानंतर करावी. |
| तूर | पावसाचा अंदाज लक्षात घेता तूर पिकामध्ये पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी.वेळेवर पेरणी केलेल्या तूर पिकामध्ये पावसाचीउघडीपपाहूनआंतरमशागतीचीकामे (डवरणी, खुरपणी) वाफसा आल्यानंतर करावी. |
| सिट्रस | झाडांच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. आवश्यकता भासलास आधी खोदलेल्या चरांद्वारे अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. झाडावरील पानसोट काढून टाकावेत. हिरवळीच्या खताच्या उपलब्धतेसाठी धेंचा किंवा ताग ४० किलो प्रती हेक्टर बियाणे या प्रमाणात पेरणी करावी. |
| तांदूळ | मित्र किडींच्या संवर्धनासाठी धान बांधावर झेंडू व चवळी पिकाची लागवड करावी.रोपवाटीका:- खोडकिडा व गादमाशीच्या व्यवस्थापनाकरिता कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार २५ किलो ग्रॅम प्रति हेक्टर (कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार २५० ग्रॅम प्रति १०० वर्ग मीटर रोपवाटीका) रोपकाढणीच्या ५ दिवस अगोदर रोपवाटीकेत टाकावे. धान रोपवाटीका तण विरहीत ठेवावी.रोपांचे शेंडे तोडून बांबूच्या टोपलीत जमा करावी त्यामुळे रोपांच्या शेड्यांवर असणारी खोडकीडींची अंडी नष्ट होवून त्यामधून परोपजिवी किटकसूद्धा बाहेर पडतील. गादमाशी प्रवण क्षेत्रामध्ये धानावरील गादमाशीचा प्रादुर्भाव कमी करण्याकरिता रोवणी २० जुलै पर्यंत करावी. तुड्तुड्यांच्या व्यवस्थापनाकरिता रोपांची पट्टा पद्धतीने लागवड करावी. (१० ओळी किंवा २ मीटर नंतर ३० सेमी. जागा मोकळी सोडावी) |
| तांदूळ | रोपांचे वय २१ ते २५ दिवसांचे झाल्यावर रोवणी करावी. त्यासाठी रोपे काढण्याच्या दोन दिवस आधी वाफ्यातील पाण्याची पातळी थोडी वाढवावी. त्यामुळे मुळे न तुटता रोप काढण्यास मदत होते.धान लावणीनंतर रोपांची मुळे चांगली रुजेपर्यंत बांधीत पाण्याची एक इंच पातळी ठेवावी. जमिनीची तपासणी करुन योग्य प्रमाणात रासायनिक खताचा वापर केल्यास शेती किफायतशीर होते. सर्वसाधारणपणे १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. संपूर्ण स्फुरद व पालाश आणि नत्राची अर्धी मात्रा चिखलावर तर उरलेली नत्राची अर्धी मात्रा दोन समान हप्त्यात (फुटवे फुटण्याच्या वेळी साधारणपणे ३० दिवसांनी आणि लोंबी येण्याच्या सुरुवातीस साधारणपणे ६० दिवसांनी) विभागून द्यावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| आंबा | आंब्याच्या केशर, दशहरी, आम्रपाली, पायरी, लंगडा या जातीच्या तयार कलमांची ८ x ८ किंवा १० x १० मीटर अंतरावर १ x १ x १ मीटर आकाराचे खड्डे तयार करून लागवड करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | पावसापासून संरक्षण करण्यासाठी जनावरांच्या गोठयाचे छप्पर दुरुस्त करून घ्यावे. जनावरे पावसात फार काळ भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. नवीन हिरवा चारा जास्त प्रमाणात खाण्यास जनावरांना प्रतिबंध करावा. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | मिरची, टोमाटो, वांगी, फुलकोबी या खरीप भाजीपाला पिकाच्या ४ ते ६ आठवडे वयाच्या रोपांची लागवड करावी. |